# MAHARASHTRA ACT No. XXXII OF 1976

## THE MAHARASHTRA SPECIAL PROVISION FOR PAYMENT OF COURT FEES ACT, 1976

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास, राज्यपाल यांची संमती दिनांक १९ जुलै १९७६ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे, सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एस. डब्ल्यू. धुरंधर,
अपर सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

# MAHARASHTRA ACT No. XXXII OF 1976

## AN ACT TO MAKE TEMPORARY PROVISIONS FOR THE COLLECTION OF FEES CHARGED OR CHARGEABLE UNDER THE BOMBAY COURT FEES ACT, 1959 OTHERWISE THAN BY STAMPS.

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात, दिनांक २२ जुलै १९७६ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ]

# सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२

**मुंबई न्यायालय शुल्क अधिनियम, १९५९ अन्वये आकारलेल्या किंवा आकारण्यायोग्य असलेल्या फीची वसुली मुद्रांकाखेरीज इतर प्रकारे करण्यासाठी तात्पुरती तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** न्यायालय शुल्काची वसुली मुद्रांकाखेरीज इतर प्रकारे करण्यासाठी तरतूद करणे इष्ट आहे, **त्याअर्थी,** याद्वारे, भारतीय गणराज्याच्या सत्ताविसाव्या वर्षी पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास महाराष्ट्र न्यायालय शुल्क भरण्यासाठी विशेष तरतूद अधिनियम, १९७६ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, प्रारंभ व कालावधी.

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमील अशा तारखेस अंमलात येईल.

(३) तो पोट-कलम (२) अन्वये हा अधिनियम ज्या तारखेस अंमलात आणला जाईल त्या तारखेस सुरू होणाऱ्या दोन वर्षांच्या कालावधीसाठी अंमलात राहील आणि त्यानंतर संपुष्टात येईल ; आणि तो अशाप्रकारे संपुष्टात आल्यानंतर, मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ याच्या कलम ७ चे उपबंध हे, जणू काही तो एखाद्या महाराष्ट्र अधिनियमाद्वारेच निरसित करण्यात आला असल्याप्रमाणे लागू होतील.

विवक्षित कालावधी-साठी मुद्रांका-ऐवजी काहीही असले तरी, बाबत्या प्रभारी आणि चलाने यांचा उपयोग

२. (१) हा अधिनियम अंमलात असेल त्या कालावधीत, मुंबई न्यायालय शुल्क अधिनियम, १९५९ याच्या कलम ३ मध्ये नमूद केलेल्या किंवा उक्त अधिनियमान्वये आकारणीयोग्य असलेल्या कोच्या रकमा, त्या अधिनियमाच्या कलम ३७ मध्ये किंवा इतर कोणत्याही उपबंधांमध्ये तद्विरुद्ध काहीही असले तरी, कोणत्याही शासकीय कोषागारात रोखीने वसूल करता येतील आणि त्याचा बाबत्या प्रभारी असणाऱ्या अधिकाऱ्याकडून त्यासाठी योग्य ती पावती किंवा चलान देण्यात येईल; आणि अशी कोणतीही पावती किंवा चलान हे भरलेल्या रकमेसाठी राज्य शासनाने पूर्वोक्त अधिनियमान्वये यथोचित रीत्या दिलेला मुद्रांक असल्याप्रमाणे या अधिनियमाच्या किंवा त्याखालील नियमांच्या प्रयोजनांसाठी पूर्वोक्त कालावधीत वापरता येईल.

अनुलेख असणे.

(२) उक्त अधिनियमाच्या कलम ४२ अन्वये नियुक्त केलेला अधिकारी, त्या पावतीवर किंवा चलानवर "रद्द केले." असे लिहून किंवा शिक्का उमटवून आणि त्यावर सही करून व रद्द केल्याची तारीख घालून ती पावती किंवा ते चलान रद्द करील.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनांसाठी "शासकीय कोषागार" या संज्ञेत शासकीय उप-कोषागार, प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई आणि या बाबतीत, राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमील असे इतर कोणतेही ठिकाण यांचा समावेश होतो.

(यथार्थ अनुवाद)

**य. शं. कानिटकर,**
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई